9 वी राष्ट्रीय उप-सल्लागारांची बैठक

कोलंबो सुरक्षा परिषदेच्या (सीएससी) 9 व्या राष्ट्रीय उप-सुरक्षा सल्लागारांच्या उच्चस्तरीय बैठकीचे 30 सप्टेंबर 2026 रोजी भारताच्या वतीने आभासी पद्धतीने आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बांगलादेश, मालदीव, मॉरिशस, श्रीलंका आणि सेशल्स आदी देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

2. सदस्य देशांनी 20 नोव्हेंबर 2025 रोजी नवी दिल्ली, भारतात आयोजित सीएससीच्या 7 व्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार-स्तरीय बैठकीत घेतलेल्या निर्णयांचा आढावा घेतला. त्यांनी सहकार्य आणि उपक्रमांच्या भविष्य आराखड्याचा (2025-2026) आढावा घेतला आणि सहकार्याच्या पाचही स्तंभांमध्ये प्रशिक्षण व क्षमता-वृद्धी उपक्रम आयोजित करण्यात सदस्य देशांनी केलेल्या लक्षणीय प्रगतीची समाधानाने नोंद घेतली.

3. सदस्य राष्ट्रांनी हिंद महासागर क्षेत्रातील महत्त्वाच्या बाबींवर सहकार्य अधिक बळकट करण्याच्या आणि मानवतावादी सहाय्य आणि आपत्ती निवारणावर त्यांची शाश्वत भागीदारी सुरू ठेवण्याच्या त्यांच्या संकल्पनेचा पुनरुच्चार केला.

4. महामहिम ब्रिगेडियर जनरल मुहम्मद अली हैदर सिद्दीकी, एसबीपी, एनडीसी, एएफडब्ल्यूसी, पीएससी, एम-फिल, पीएचडी (महासंचालक, पंतप्रधान कार्यालय, सशस्त्र दल विभाग, बांगलादेश प्रजासत्ताक), पवन कपूर (उप-राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (धोरणात्मक व्यवहार), भारत प्रजासत्ताक), मेजर जनरल हमीद शफीग (निवृत्त) (उप राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, मालदीव प्रजासत्ताक),. के. जयप्रकाश (सुरक्षा विषयांचे प्रधान समन्वयक, पंतप्रधान कार्यालय, मॉरिशस प्रजासत्ताक), जोएल मॉर्गन (सेशल्स प्रजासत्ताकाच्या राष्ट्राध्यक्षांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार), पी. डी. इंदिका एल. विजेगुनावर्धना (अतिरिक्त सचिव (संरक्षण), संरक्षण मंत्रालय, श्रीलंका), सीएससी सचिवालयाचे प्रतिनिधित्व सीएससीचे महासचिव, व्हाईस ॲडमिरल एस. एन. घोरमाडे (निवृत्त) यांनी केले. त्यांनी कोलंबो, श्रीलंकेत पदभार स्वीकारला आहे.

नवी दिल्ली

30 सप्टेंबर 2026